## एन्.पी.ए. -

पतसंस्थांना एन्. पी. ए. ची संकल्पना लागू केल्यापासून बऱ्याच अडचणी आल्या. मात्र आपल्या संस्थेने १००% एन्. पी. ए. तरतुद केल्याने एन्. पी. ए. प्रमाण ०% पडते शिवाय शासनाच्या आवाहनानुसार अडचणीतील पतसंस्था विलीन करून घेतल्याने ३ वर्षाची एन्. पी. ए. तरतूदीची सवलतही मिळाली आहे.

## गुंतवणूक - १२,७८,०७,३००/००

नियमाप्रमाणे कर्जवाटप करून तरलतेची (लिक्वीडीटी) रक्कम किफायतशिर व्याजाने व ''ए'' ग्रेड बँकामध्येच गुंतविली आहे. अशी रक्कम **३१ मार्च २००९** ला रु. **१२,७८,०७,३००/००** इतकी आहे.

## लेखापरिक्षण -

संस्थेस २००७/२००८ सालीही लेखापरिक्षण वर्ग ''अ'' मिळाला आहे व सन २००८/२००९ चे लेखापरिक्षण **श्री. एम्. एम्. धर्माधिकारी चार्टड अकौटंट, कोल्हापूर** यांनी सुरु केले आहे.

## नफा विभागणी -

सन २००८/२००९ सालांत निव्वळ नफा रक्कम रु. ५०,१०,४१६/१७ झाला आहे. त्याची संचालक मंडळाने केलेली विभागणी पुढीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशील | रुपये | पैसे |
|---|---|---|---|
| १. | रिझर्व्ह फंड २५% | १२,५२,६०४ | ०० |
| २. | लाभांश १२% | १५,०५,४९६ | ०० |
| ३. | थकव्याज तरतुद | १६,२६,२७४ | ५५ |
| ४. | श्री वसंतराव चौगुले मेमोरियल ट्रस्ट | ५,०१,०४१ | ६२ |
| ५. | रौप्य महोत्सवी निधी | १,२५,००० | ०० |
| | एकूण | ५०,१०,४१६ | १७ |

## विशेष उपक्रम -

संस्थेने बँकींग सेवेबरोबरच खेळ, शिक्षण, आरोग्य, रक्तदान इत्यादी बाबतीत भरीव मदत केली आहे. तसेच गतवर्षीपासून सभासदांना, ग्राहकांना ज्ञानाची मेजवाणी मिळावी या उदात्त हेतूने व्याख्यानमाला सुरू केली आहे. यावर्षी तीन दिवसाची व्याख्यानमाला घेऊन मा. श्री. व्ही. डी. कटांबळे - पिढी कालची नी आजची, मा. श्री. निनाद बेडेकर इतिहास संशोधक पुणे यांचे - ''धर्मवीर छत्रपती संभाजी'' आणि हसवून हसवून तणावमुक्त करून जीवनाचे सार सांगणारे मा. श्री. आप्पासाहेब खोत यांचे कथाकथन झाले. त्याला सभासदांनी ग्राहकांनी उदंड प्रतिसाद दिला. सध्याच्या या धकाधकीच्या जीवनांत तणावमुक्त जगणे, निरोगी जगणे अत्यंत महत्वाचे आहे. यावर उत्तम उपाय म्हणजे ''योगा'' होय. त्याकरिता संस्थेने आंतरराष्ट्रीय कीर्तीचे धन्वंतरी डॉ. धनंजय गुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सभासद, संचालक, सेवक व कुटुंबीय यांच्या करिता सवलतीमध्ये योगशिबीरे